# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director Students' Welfare (I/c.)**
**Ph. No. - 07132-223320**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** nssdsw.gug@ gmail.com

पत्र क्र. **No.GU/DSW /525 /2025** **Dt: 07.08.2025**

**प्रति,**

**मा. प्राचार्य**
**संलग्नित सर्व महाविद्यालय/ विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय : आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा २०२४-२५**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लेखनगुणांना व सृजनशिलतेला महाविद्यालयीन स्तरावर व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या लेखण्न कलेला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने विद्यापीठाद्वारे आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेचे आयोजन शैक्षणिक सत्र २०१३-१४ पासून सुरू करण्यात आले आहे. सदर वार्षिकांकच्या प्रकाशनासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून प्राप्त वार्षिकांक शुल्काच्या रक्कमेतून आपल्या महाविद्यालयात वार्षिकांक प्रकाशित होणे अपेक्षित आहे.

पुस्तून स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकाकाला रू. ७,०००/- चे रोख बक्षिस तसेच द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकास रू. ५,०००/- व ३,०००/- तेसचे दोन उत्तेजनार्थ रू. १,०००/- प्रति पुरस्कार बक्षिस देण्यात येतील. सोबत प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देवून पुरस्कृत महाविद्यालयाचा गौरव करण्यात येईल समान गुण प्राप्त करण्याऱ्या वार्षिकांकाना बक्षीस विभागून देण्यात येईल. वार्षिकांकाचे मुल्याकन व गुणविभागणी खालील नियमाच्या अधारे करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

७. **विद्यार्थ्यांचा सहभाग (गुण -२०) :-** यात फक्त वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी / विद्यार्थीनीचा सहभाग अपेक्षित आहे. महाविद्यालयातील सर्व विद्याशाखा आणि वर्ग यांचा सहभाग असावा. लेखण सर्व विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीभूत असावे.

८. **रचनांचा अशय (गुण - २०) :-** वार्षिकांकात प्रकाशित मजकूर विद्यार्थी/ विद्यार्थीनीचा असावा. प्राध्यापकांकडून लेखन अपेक्षा नाही. क्वचित लेखण प्रकाशित झालेच तर त्या लेखनाचे मूल्याकन करण्यात येणार नाही. वार्षिकांकातील लेखण महाविद्यायात अध्यापन होणाऱ्या भाषेतील असावे मराठी, हिन्दी, इंग्रजी, संस्कृत व उर्दू आदि. गद्य-पद्यात्मक लेखनाचा दर्जा तपासतांना त्यातील संपन्न आशयाचा विचार करण्यात यईल.

९. **रचनांची शैली (गुण - २०) :-** रचनाच्या विषयाची मांडणी शैलीदार असावी. विषय वाचकांपूढे ठेवतांना शैली साधी व सरळ अनलकृत असावी अलंकारीतक असल्यास कृत्रिम असू नये, तसेच अनुकरण असू नये.

१०. **अंकाची निर्मीती (गुण - २०) :-** वार्षिकांकाची निर्मीती चांगली असावी, यात अंकाची एकुण आकर्षकता ठरवितांना खालील चार बाबी विचारार्थ घेण्यात येतील. **अ)मुखपृष्ठ, ब)छापाई, क) बांधणी, ड) रचना अथवा मजकूराची मांडणी.**

११. **संबंधीत शैक्षणिक वर्षाचे संदर्भमान (गुण - १५) :-** वार्षिकांक प्रसिध्द करतांना संबंधित शैक्षणिक वर्षातील महत्वाच्या म्हणजे संस्मरणीय घटना, व्यक्ती, प्रसंग, जन्मशताब्दी व पर्यावारण आदिंची दखल घेतलेली असावी. विषयांची विविधता आणि विशेषता हवी.

१२. **वार्षिकांकाचे शिर्षक (गुण - ०५) :-**

संबधीत शैक्षणिक सत्रात प्रकाशित होणाऱ्या वार्षिकांकात जाहिराती झालेल्या नसाव्या. ज्या वार्षिकांक जाहिराती प्रसिध्द केल्या असतील अशा वार्षिकांकाचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

तरी आपल्या महाविद्यालयाद्वारे २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात प्रकाशित झोलल्या वार्षिकांकाच्या १० प्रती प्रस्तून स्पर्धेसाठी **दिं १८ ऑगस्ट २०२५** पर्यंत संचालक विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयात पाठवावे. तसेच दरवर्षी नियमितपणे वार्षिकांक प्रकाशित करावा अशी आपणास विनंती आहे.

**धन्यवाद!**

Seal

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली